DDU-GKY
Empowering India • Powering the World

महाराष्ट्र शासन

उमेद

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

सिडको भवन, ५ वा मजला, दक्षिण कक्ष, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दूरध्वनी क्र. - ०२२-२७५६२५५२/५४

जा.क्र. एमएसआरएलएम/DDU-GKY/1219 /२०१७
दिनांक 30/०५/२०१७

दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेअंतर्गत इच्छुक संस्था/कंपन्यांकडून प्रकल्प प्रस्ताव मागविण्याकरीता मुदतवाढ सूचना
अर्ज करणेसाठी शेवटची मुदत दि १० जुन २०१७

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान मार्फत दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत इच्छूक संस्थांकडून राज्यातील सूमारे २५,०७४ युवक/युवतींना कौशल्य विकासातून रोजगार मिळवून देण्याकरीता तसेच सदर उद्दिष्टांपैकी २००० एवढे उद्दिष्ट रोशनी प्रकल्पांतर्गत गडचीरोली जिल्हयांतर्गत राबविण्यासाठी प्रस्ताव मागविण्याचे प्रस्तावित आहे.

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत इच्छूक प्रकल्प अंमलबजावणी संस्थांकडून महाराष्ट्र राज्यात दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. प्रस्ताव पाठविण्याच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रकल्प प्रस्ताव कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त दोन वर्षाचा असावा.
२. प्रकल्पामार्फत किमान १००० व जास्तीत जास्त २००० युवक/युवतींना कौशल्य विकास व रोजगार मिळवून देण्याचे लक्ष्य असावे.
३. उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने प्रकल्प छाननी करिता गठीत केलेल्या समितीकडे खालील बाबींना अनुसरुन प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे सर्व अधिकार असतील.
   अ. प्रकल्पाचे एकूण लक्ष्य
   ब. प्रस्तावित खर्चाचे निकष (ग्राम विकास विभाग, भारत सरकार यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे)
   क. जिल्हे व जिल्हानिहाय लक्ष्य
   ड. प्रस्तावित व्यवसाय आणि प्रकल्पाचा कालावधी (प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी हा कमीतकमी ३ महिने (५७६)तास तसेच ६ महिने (११५२)तास असावा)

इच्छुक संस्थांनी त्यांचे प्रस्ताव www.ruralskills.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने सादर करावे. ऑनलाईन अर्जासह रू २५,०००/ एवढी रक्कम फि म्हणुन Mission Director, Maharashtra State Rural Livelihoods Mission(MSRLM), State Bank of India, Account Number- ३५१५५६७८६९४, IFSC : SBIN०००६२४०, Konkan Bhavan Branch, Ground Floor, South Wing, CIDCO Bhavan, CBD Belapur, New Mumbai या खात्यावर जमा करावी.

३ एप्रिल २०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या Notification क्र २०/२०१७ तसेच DDU-GKY मार्गदर्शक सुचनांनुसार नविन अर्जांची छानणी केली जाईल. अधिक माहितीसाठी www.ddugky.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक ही १० जुन २०१७ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. अपुर्ण असलेले प्रस्ताव हे रद्द ठरविण्यात येतील याची कृपया नोंद असावी. अधिक माहितीकरीता राज्य अभियान व्यवस्थापक, रोजगार निर्मिती व कौशल्यवृध्दी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ईमेल आयडी msrlmskills@gmail.com यावर संपर्क साधावा.

29/5/17

आर. विमला, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान